# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.
फॅक्स २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web Site : - www.ropune.org.in


**अतितात्काळ / कालमर्यादित :**

जा.क्र.तंशिविकापु/विवि/पदवी/जा.वै.प्र./माहिती/२०१८/ 5302
दिनांक : 14/12/18

प्रति,
संचालक / प्राचार्य,
पुणे विभागातील सर्व
अभियांत्रिकी पदवी महाविद्यालये.

**विषय :- शै.वर्ष २०१८-१९ मध्ये प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमात जात वैधता प्रमाणपत्रा अभावी प्रवेश रद्द केलेल्या उमेदवारांबाबत माहिती.**

संदर्भ :- १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक : २अ/एडीएम/ २०१८/१५७५ दि. १२/१२/२०१८.
२. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक : २अ/एडीएम/ २०१८/१५८२ दि. १४/१२/२०१८.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रांस अनुसरुन, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमामध्ये जात वैधता प्रमाणपत्राऐवजी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी केलेल्या अर्जाची पावती सादर करुन, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश घेतलेल्या उमेदवारांनी प्रथम वर्ष पदवी अभियांत्रिकीकरीता दिनांक २५.०८.२०१८ पर्यंत, थेट व्दितीय वर्ष पदवी अभियांत्रिकी करीता दिनांक ३०.०८.२०१८ पर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक होते.

याबाबत या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्थाप्रमुखांना सूचित करण्यात येते की, जात वैधता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर करु न शकल्याने, आपल्या संस्थेतील प्रवेश रद्द केलेल्या शाखानिहाय उमेदवारांची संख्या तसेच विहीत मुदतीनंतर जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या उमेदवारांची संख्या व शाखानिहाय प्रथम वर्ष व व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमात उपलब्ध असलेल्या रिक्त जागांची माहिती **दिनांक १५.१२.२०१८ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत या कार्यालयाच्या संकेतस्थळावर संस्थेच्या लॉगीनमधुन सोबत जोडलेल्या प्रपत्रात भरण्यात यावी. तसेच सदर माहितीची info.ropune@gmail.com या ई-मेलवर सॉफ्ट कॉपी व प्राचार्यांच्या स्वाक्षरीची प्रत, पी.डी.एफ. फॉरमॅटमध्ये या दोन्ही प्रकारे पाठविण्यात यावी.**

सदरची माहिती मा. उच्च न्यायालयास सादर करावयाची असल्याने, प्रथम प्राधान्याने विहित मुदतीत बिनचूकपणे सादर करावी.

14/12/18
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

सोबत : विहित प्रपत्र.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

# प्रपत्र

| संस्थेचे नांव व डी.टी.ई कोड | अभ्यासक्रमाचे नांव | दि. २५.०८.२०१८ पर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने प्रवेश रद्द केलेल्या प्रथम वर्ष पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या | दि.२५.०८.२०१८ नंतर जात वैधताप्रमाणपत्र प्राप्त झाले असल्यास अशा उमेदवारांची संख्या | प्रथम वर्ष पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमास रिक्त असलेल्या जागांची संख्या | दि.३०.०८.२०१८ पर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने प्रवेश रद्द केलेल्या थेट व्दितीय वर्ष पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या | दि. ३०.०८.२०१८ नंतर जात वैधताप्रमाणपत्र प्राप्त झाले असल्यास अशा उमेदवारांची संख्या | थेट व्दितीय वर्ष पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमामध्ये रिक्त असलेल्या जागांची संख्या | प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्यांचे नांव व ॲप्लिकेशन आयडी व प्रवेशित वर्ष (प्रथम / व्दितीय) | विहित मुदतीनंतर जात वैधताप्रमाणपत्र प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांचे नांव व ॲप्लिकेशन आयडी व प्रवेशित वर्ष (प्रथम / व्दितीय) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |

दिनांक :

संस्थाप्रमुखांची स्वाक्षरी